सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर कृती आराखडयामधील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत प्राप्त अनुदानातून शहरी भागामध्ये Vulnerable Mapping करण्यासाठी आवश्यक Forms च्या छपाई निविदा प्रक्रियेद्वारे करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०५१९/प्र.क्र.३३८/आरोग्य-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. राआसो/Vulnerable Mapping Forms Printing/ प्रशासकीय मान्यता/१०५५८/ २०१९, दिनांक ०८ मे, २०१९.

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक ०७ मे, २०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

प्रस्तावना:-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर कृती आराखडयामधील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत प्राप्त अनुदानातून ९५ शहरांमध्ये Vulnerable Mapping करण्यासाठी आवश्यक Forms च्या अंदाजित रक्कम रु.३४.५८ लक्ष इतक्या रकमेच्या छपाई खर्च प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानात सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील कृती आराखडयास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर मंजुरी अंतर्गत ९५ शहरांमध्ये म.न.पा. व न.पा. व कटक मंडळे स्तरावर Vulnerable Mapping आशा यांच्याकडून करणे अपेक्षित आहे. त्याकरीता केंद्र शासनाने FMR Code U.१०.२.२ Mapping of Slums & Vulnerable Population in Metro Cities/ Other Cities and Towns अंतर्गत रु.६०.०० लक्ष इतका निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदर निधीमधून Vulnerable Mapping आशा कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन करण्यात येणार आहे. त्याकरीता आवश्यक असणाऱ्या छपाई व त्याच्या कुरीयर खर्चाकरीता अंदाजित रक्कम रु.३४.५८ लक्ष इतक्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास सादर केलेला आहे.

त्यानुषंगाने पीआयपीत मिळालेल्या मंजूरीनुसार प्राप्त अनुदानाच्या अधीन राहून आवश्यक Forms छपाई व त्याच्या कुरीयरसाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु.३४.५८ लक्ष रकमेच्या निविदा प्रक्रियेस खालील विवरणपत्रानूसार पुढील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.:-

विवरणपत्र

Sr. No.	Item	Qty.	Unit Rate Approx. (In Rs.)	Total Amt. (In Lakhs.)
1	Group Discussion Tools for Vulnerable Slums (A) Forms Filled by Medical Officer	80380	0.65	0.52
2	Ward Level Vulnerability Assessment Tools Forms (B) Filled by ANMs/ LHVs	500000	0.65	3.25
3	Vulnerability Assessment Tool for ASHAs (C) Filled by ASHAs	4684540	0.65	30.40
4	Expected Courier (In Kg.)	1200 Kg.	34.00	0.41
Total				**34.58**

अटी :-

१) सदर Vulnerability Mapping Survey Forms छपाई सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा /खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या छपाईसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू Vulnerability Mapping Survey Forms छपाई सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित छपाईचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रियेअंती न्युनत्तम दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) छपाई करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच छपाई करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) छपाई करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू छपाईसाठी होणारा खर्च राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कृती आराखडा सन २०१९-२० मध्ये FMR Code U.10.2.2 Mapping of Slums & Valunerable Population in Metro Cities/ Other Cities and Towns अंतर्गत रु.60.00 लक्ष इतका निधी उपलब्ध असून सदर अनुदानातून छपाईसाठी येणारा खर्च भागविण्यात यावा. सदरची छपाई प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यक्रम प्रमुखांची राहील.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908061209232817 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.08.06 15:14:53 +05'30'

(ज. स. तडवी)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)